# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**वित्त व लेखा विभाग**
**आय.एस.ओ.९००१-२०१५ युनिट**

**परिपत्रक**

## <u>गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब सादर करण्याबाबत</u>...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत महाविद्यालय/संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/संस्थेस राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे. तसेच यापूर्वी महाविद्यालय/संस्थांना बांधकामासाठी सन २०१२-१३ ते २०१६-१७ मध्ये अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे.

चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आणि बांधकाम या सर्व मंजूर अर्थसहाय्याच्या खर्चाचे लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले हिशेब वित्त व लेखा विभागामार्फत गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत केंद्रीय पध्दतीने खालील प्रमाणे स्वीकारण्यात येणार आहेत.

<table>
<tr><th>जिल्हा/शहर</th><th>दिनांक</th><th>वेळ</th><th>ठिकाण</th></tr>
<tr><td>नाशिक</td><td>५/०३/२०१८</td><td>९ ते ५</td><td>विद्यापीठ उपकेंद्र नाशिक</td></tr>
<tr><td>अहमदनगर</td><td>६/०३/२०१८</td><td>१० ते ५</td><td>न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर</td></tr>
<tr><td>पुणे जिल्हा (ग्रामीण)</td><td>८/०३/२०१८</td><td>९ ते ५</td><td rowspan="3">पर्यावरणशास्त्र विभाग,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.</td></tr>
<tr><td>पुणे शहर<br>*(अ.क्र.१ ते १८२)</td><td>९/०३/२०१८</td><td>९ ते ५</td></tr>
<tr><td>पुणे शहर<br>* (अ.क्र.१८३ ते ५०६)</td><td>१०/०३/२०१८</td><td>९ ते ५</td></tr>
</table>

* नियोजन व विकास विभागाच्या विभागवार यादीतील अनुक्रमांक नुसार

**पुणे शहरातील चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांचे अनुदान मंजूर प्रस्ताव संख्या जास्त असल्याने दि.९ व १० मार्च, २०१८ अशा दोन दिवसांत महाविद्यालय/संस्थांची विभागणी करण्यात आलेली आहे त्याची यादी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर www.unipune.ac.in> Circulars>Finance Circulars मध्ये स्वतंत्रपणे टाकण्यात आली आहे. संबंधित महाविद्यालय/संस्थांनी त्या त्या दिवशी हिशेब सादर करणे अनिवार्य आहे. चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळाबरोबरच संबंधित महाविद्यालय/संस्थांनी बांधकामाचे हिशेब प्रलंबित असतील तर ते ही त्याच दिवशी केंद्रिय हिशेब तपासणी शिबीरामध्ये सादर करावेत.**

राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आयोजन खर्च, बांधकाम खर्च यांचे हिशेब सादर करण्यासंदर्भातील नियमावली तसेच विहित नमुन्यातील तक्ते विद्यापीठाच्या संकेत स्थळावर www.unipune.ac.in>Circulars>Finance Circulars मध्ये **<u>"QIP PRESENTATION"</u>** या विषयांतर्गत स्वतंत्रपणे टाकण्यात आले आहेत.

शिबीराच्या ठिकाणी नियोजन व विकास विभागाने महाविद्यालय/संस्थेच्या मंजूर यादीत नमूद केलेल्या त्रुटी, इत्यादी कागदपत्रांच्या पूर्ततेचे प्रमाणिकरण केल्यानंतरच केंद्रीय लेखा परिक्षण शिबीराच्या ठिकाणी हिशेब सादर करण्यात यावेत.

महाविद्यालय/संस्थांना बांधकामासाठी सन २०१२-१३ ते २०१६-१७ मध्ये अर्थसहाय्य मंजूर झाल्यापासून दोन वर्षाच्या कालावधीत बांधकाम पूर्ण करुन हिशेब सादर करणे आवश्यक होते. तथापि ज्या महाविद्यालय/संस्थांनी उचल रक्कम घेतलेली आहे अशा सर्व महाविद्यालय/संस्थांनी बांधकामाचे हिशेब मार्च २०१८ च्या केंद्रिय लेखापरीक्षण शिबिरामध्येच सादर करणे बंधनकारक आहे.

ज्या महाविद्यालय/संस्थांनी बांधकामासाठी उचल रक्कम घेतलेली आहे परंतु अद्याप हिशेब सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालय/संस्थांना हिशेब शिबिरामध्ये अन्य कोणतेही रक्कम अदा केली जाणार नाही याची महाविद्यालय/संस्थांनी गांभीर्याने नोंद घेऊन बांधकामाचे हिशेब केंद्रिय लेखापरीक्षण शिबिरामध्ये सादर करावेत.

शिबिरामध्ये हिशेबाची पूर्तता झाल्यानंतर धनादेशाद्वारे अर्थसहाय्याची रक्कम अदा करण्यात येईल.

सदर कालावधीत महाविद्यालय/संस्थांकडून विद्यापीठास हिशेब सादर न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय/संस्थेची राहील, याची कृपया नोंद द्यावी.

Gargote

**सीए (डॉ.) विद्या गारगोटे**
**वित्त व लेखा अधिकारी**
**अतिरिक्त कार्यभार**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१७-१८/१९८३
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०१८

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.